INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# करवीर घराण्यातील महाराणी जिजाबाई यांचे कार्य

**प्रा. डॉ. आर. ए. चव्हाण**
(इतिहास विभाग)
ज. भ. शि. प्र. मंडळाचे महिला महाविद्यालय,
गेवराई, जि. बीड
E-mail: rchavan1972@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/11.2021-13285641/IRJHIS2111002

**प्रस्तावना :**

मराठ्यांच्या इतिहासातील एक घटना ११ मार्च १६८९ रोजी छत्रपती संभाजी महाराजाची औरंगजेब बादशहाने तुळापूर येथे हत्या केली. संभाजी पुत्र शाहु व पत्नी यशुबाई यांना मोगल बादशहाने कैद केले. २० फेब्रुवारी १७०७ रोजी मोगल बादशहाचा मृत्यु झाला. झुल्फिकारखानाने मराठ्यांच्या सत्तेत दुही निर्माण करण्यासाठी आजमशहाला छत्रपती शाहुची सुटका करण्याचा सल्ला दिला त्यायोगे ८ मे १७०७ रोजी शाहुची सुटका झाली. तेव्हापासून शाहु विरूध्द ताराबाई असा भाऊ बंदकीचा एक नवा संघर्ष निर्माण झाला. १२ ऑक्टोबर १७०७ रोजी खेड येथे शाहु विरूध्द ताराबाई यांच्यात लढाई झाली शाहुचा विजय आणि ताराबाईचा पराभव ताराबाई सातारा येथुन दक्षिण महाराष्ट्रात पन्हाळ्याला निघुन गेल्या आणि तेथेच इ.स. १७१० मध्ये करवीर घराण्याची स्थापना केली. आपला पुत्र करवीर शिवाजी पहिले यांना गादीवर बसविले.[१] इ.स. १७१४ मध्ये सत्तांतर झाले छत्रपती राजाराम यांच्या द्वितीय पत्नी राजसबाईचा पुत्र करवीर संभाजी पहिले सत्तेवर आले.[२]

करवीर शिवाजी पहिले यांच्यानंतर करवीर संभाजी पहिले यांनी इ.स. १७१४ ते १७६० पर्यंत कोल्हापूरच्या गादीवर होते. करवीरच्या इतिहासात संभाजी महाराजाची कारकीर्द महत्वाची आहे. त्यांच्या कालखंडात निजामाबरोबर मैत्रिचे संबंध निर्माण झाले. इ.स. १७२८ पालखेडच्या युध्दात सहभागी होते.[३] करवीर संभाजी आणि छत्रपती शाहु यांच्यात २७ फेब्रुवारी १७३१ रोजी भेट झाली. दोन्ही राजबंधुत १३ एप्रिल १७३१ रोजी वारणा तह झाला. वारण नदीने दोन्ही राज्यांची सिमा निश्चित करण्यात आली.[४]

**महाराणी जिजाबाई : -**

करवीर संभाजी यांच्या आई राजसबाई यांनी करवीर संभाजी गादीवर बसल्यानंतर काही दिवस कारभार स्वत: केला. परंतु करवीर संभाजी स्वत: वयात आल्यानंतर कारभार पाहू लागल्यामुळे राजसबाईंनी आपले कारभारातले लक्ष कमी केले. त्या इ.स. १७५१ मध्ये निधन पावल्यानंतर जिजाबाईंच्या कारभारासंबंधी कागदोपत्री उल्लेख आढळतो. करवीर संभाजी यांच्या मृत्युनंतर कोल्हापूरचे छत्रपती घराणे सुरक्षित ठेवण्याची सर्व जबाबदारी त्यांची पत्नी महाराणी जिजाबाई यांच्यावर पडली होती आणि त्यांनी ती सुमारे १२ वर्षे मोठ्या जिद्दीने पार पाडली. जिजाबाईने राज्यकारभारात त्यापूर्वीपासून लक्ष घालण्यास सुरूवात केली होती. त्या करवीर संभाजी यांना केवळ सल्लाच देत नसत, तर सरदारांना आणि कारभाऱ्यांना प्रत्यक्ष आज्ञाही करत असत. अनेक ठिकाणी त्यावेळच्या पत्रव्यवहारात छत्रपती करवीर संभाजी यांच्याबरोबर जिजाबाईंचाही उल्लेख केला गेला आहे. तर काही पत्रे जिजाबाईंनी

स्वतंत्रपणे लिहिलेली आहेत. करवीर संभाजी पहिले यांना संतान नव्हते म्हणून वारसाचा प्रश्न निर्माण झाला. आपल्या प्रभावाखालील व्यक्ती पेशव्यांनी कोल्हापूरच्या गादीवर बसविण्याचा घाट घातला होता, परंतु जिजाबाईंना तो बेत मान्य नव्हता. त्यामुळे त्यांनी पेशव्यांच्या योजनेला विरोध दर्शविला. तो विरोध मोडून काढण्यासाठी पेशव्यांनी पाच-सहा हजार फौजेसह विसाजी नारायण व सदाशिव अवधूत यांना पाठविले. ते दोघेही इचलकरंजीचे सरदार होते. त्यांच्या बरोबर महादजी भोसले, मुंगीकर यांचा भाऊ उमाजी भोसले हा ही होता. या उमाजीलाच कोल्हापूर राज्याच्या गादीवर बसवावे असे पेशव्यांचा आग्रह होता. त्यासंबंधी पेशव्यांनी आपल्या मनाप्रमाणे घडवून आणण्यासाठी सर्व उपाय योजले आणि शेवटी लष्कर पाठवून कोल्हापूरचे राज्य जप्त करण्याचे ठरविले.[५]

संभाजीची सत्ता समाप्त झाल्याचे वर्तमान येथे आल्यावर पेशव्यांनी श्रीमंत विसाजी नारायण व सदाशिव अवधूत यास जिजाबाईकडे रवाना केले व उमाजी मुंगीकर यास राजा करावा व त्यांचा कारभार जिजाबाईने परावा असे सांगितले. पन्हाळा, रांगण याप्रमाणे किल्ले घ्यावेत, वरकड जो बंदोबस्त करणे तो सर्वार्थांनी करावा आणि महाराणी ताराबाईप्रमाणे खाऊक खर्च नेमून घ्यावा. त्याप्रमाणे खाऊन स्वस्थ रहावे. याप्रमाणे कबूल केल्यास उत्तम नाही तर जप्ती करावी. ज्या किल्ल्यात जिजाबाई असेल त्या भोवती वेढा घालुन बसावे. जिजाबाईपुढे मोठा पेच प्रसंग निर्माण झाला होता. नानासाहेब पेशवे यांनी वेळोवेळी दिलेली वचने आणि आश्वासने खोटी ठरली. त्यांचा जिजाबाईला अनुभव आला होता. त्यांनी पेशव्यांच्या या वृत्तीबद्दल आपली तीव्र नापसंती व्यक्त केली होती. विशेषत: इचलकरंजीचे नारायणराव व्यंकटेश घोरपडे यांना पत्र पाठवून पेशव्यांच्या विसंगत धोरणचा त्यात त्यांनी उल्लेख केला होता.

आम्ही चौघी राण्या आहोत, त्यात पुसाबाई गरोदर होत्या. त्यांना मुलगी झाली. कोल्हापूर राज्यासाठी दत्तक घेण्याचा प्रश्न उपस्थित होत होता. हा प्रश्न आपल्या इच्छेप्रमाणे सोडविला पाहिजे, अशी जिजाबाईची महत्वकांक्षा होती.[६]

आपले राज्य स्वतंत्र आहे. तेव्हा या राज्याचा वारस कोण असावा? याचा निर्णय आपणच घेऊ शकतो अशी जिजाबाईची धारणा होती. त्यांनी शरिफजी यांच्या वंशातील शहाजी राजे खानवटकर यांचा पुत्र मानकोजी यास दत्तक घेऊन छत्रपती करवीर शिवाजी महाराज दुसरे असे नामकरण करून २२ सप्टेंबर १७६२ रोजी दत्तक समारंभ मोठ्या थाटात पार पाडला. विजया दशमीच्या मुहूर्तावर यथाविधी शिवाजी दुसरे यांना सिंहासनारूढ केले. जिजाबाईनी पेशवे, निजाम, हैदरअली आणि जवळपासची इतर संस्थाने यांना वस्त्रे व अज्ञापत्रे पाठविली. आईसाहेबांच्या नावे शिक्कामोर्तब व कागदपत्रे होते ते बंद करून छत्रपती करवीर शिवाजी दुसरे यांच्या नावे सर्व कारभार केला.[७]

**निष्कर्ष: -**

१) जिजाबाईने छत्रपती करवीर संभाजी महाराजांच्या राज्यकारभारात प्रत्यक्ष सहभाग घेवुन करवीर घराणे टिकविण्यासाठी प्रयत्न केला.

२) महाराणी जिजाबाईने मानकोजी यास दत्तक घेऊन करवीर घराण्याचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले.

**सारांश : -**

महाराणी जिजाबाईने करवीर घराणे टिकविण्यासाठी व आपल्या राज्याच्या सुरक्षिततेसाठी केलेले प्रयत्न मोलाचे आहेत. एवढ्यावरच न थांबता खुद्द पेशव्यांशीही निरनिराळ्या प्रसंगी करार करून त्यास राज्याच्या सिमेवरील उपद्रव थांबविण्याच्या दृष्टीने प्रतिबंधक अटी नमुद करून घेतल्या. माधवराव पेशवे आणि कोल्हापूरचे छत्रपती करवीर शिवाजी महाराज दुसरे यांचे संबंध चांगले राहिले पाहिजेत म्हणून प्रयत्न केला. याचा अर्थ मराठ्यांचे दोन्ही घराणे एकत्र रहावे असे महाराणी जिजाबाई यांना शेवटी वाटले

असावे. इ.स. १७८८ मध्ये छत्रपती करवीर शिवाजी महाराजाने पन्हाळ्याहून आपली राजधानी कोल्हापूरास आणली आणि कोल्हापूर मधूनच आपला राज्यकारभार करू लागले. या कामगिरीमध्ये खऱ्या अर्थाने छत्रपती करवीर शिवाजी यांच्या धोरणाला अनेक महत्वपूर्ण पुरूषाप्रमाणे स्त्रियांचीही साथ लाभल्यामुळे छत्रपती करवीर शिवाजी महाराज पन्नास वर्षे राज्य करू शकले. त्यात जिजाबाईचे योगदान अती मोलाचे आहे.

**संदर्भसूची : -**


१) गर्गे स.मा., करवीर रियासत (इ.स. १७१० ते १८८३) पुणे, १९६८, पृ.क्र. २६३.

२) पवार अप्पासाहेब, ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड पहिला, प्रकाशक- डॉ. उषा इथापे, कुलसचिव शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६९, पृ.क्र. ४२१.

3) Maharashtra State Gazetters, Kolhapur District, 1960, P.N. 72.

४) खरे ग.ह., आणि कुलकणी अ.रा., मराठ्यांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९८६, पृ.क्र. ३५८.

५) गर्गे स.मा., करवीर रियासत (करवीर घराण्याच्या इतिहास इ.स. १७१० ते १८८३) गो.य. राणे, पुणे, १९६८, पृ.क्र. १९९.

६) किता, पृ.क्र. २००.

७) खरे ग.ह., कुलकर्णी अ.रा., मराठ्यांचा इतिहास खंड ३, मराठी सत्तेचा उत्तरार्ध, १७६१-१८४८, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९६८ पृ.क्र. ३६३.